


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




Sangamner । MAHMAR/2018/75654 । वर्ष ८ । अंक ३९ । १२/६/२०२५ (दैनिक) । किंमत रु.२/- । पाने ४







# शौचास जाण्याच्या कारणावरुन विवाहितेचा खून!

## संगमनेर तालुक्यातील धक्कादायक घटना

## बापासह मुलगा आणि सून गजाआड



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

मालकीहक्काच्या शेतात शौचास गेल्याच्या रागातून विवाहितेला शिवीगाळ करण्याचा प्रकार घडल्यानंतर त्याचा जाब विचारणाऱ्या तिच्या कुटुंबावर तिघांनी चाकूहल्ला करीत एकीचा निर्घून खून केल्याची धक्कादायक घटना तालुक्याच्या पठारभागातून समोर आली आहे. या घटनेत अन्य एका महिलेलाही गंभीर दुखापत झाली असून पुढील उपचारांसाठी तिला प्रवरानगरला हलवण्यात आले आहे. या प्रकरणी घारगाव पोलिसांनी खून व खुनाच्या प्रयत्नासह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रोसिटी) गुन्हा दाखल करुन मुरलीधर पडवळ याच्यासह त्याचा मुलगा विक्रम आणि त्याची पत्नी अलका या तिघांनाही अटक केली आहे, आज त्यांना न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे. या घटनेने संगमनेर तालुक्यात खळबळ उडाली असून अतिशय किरकोळ कारणावरुन एका २८ वर्षीय विवाहितेचा बळी गेल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

■ केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन होवून ११ वर्ष झाल्याचा उत्सव सध्या देशभर सुरु आहे. काँग्रेसने सात दशकांच्या राजवटीत गरीबांना घरं, स्वच्छ पाणी आणि शौचालय ही पायाभूत सुविधाही दिली नाही, आम्ही कोट्यवधी गरीबांना त्याचा लाभ देवून हर घर शौचालय अभियान सर्वत्र पोहोचवल्याचा ढोलही भाजपकडून बडवला जात आहे, त्याचवेळी प्रगत म्हणवणाऱ्या संगमनेर तालुक्यात स्वातंत्र्यानंतर आजही पाणी, रस्ता आणि वीज या पाठोपाठ आता शौचालयासारख्या मुलभूत गोष्टीही दूरच असल्याचे नवे उदाहरण समोर आले आहे. चार-चार आमदारांचे छत्र लाभलेल्या संगमनेर तालुक्यातील हे चित्र अतिशय धक्कादायक असून सरकारच्या कल्याणकारी योजना केवळ कागदावरच यशस्वी आहेत की काय अशीही शंका निर्माण झाली आहे.

याबाबत घारगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरचा प्रकार मंगळवारी (ता.१०) सायंकाळी (पान ३ वर)

# अकोले व संगमनेर तालुक्यातील सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्या : ना. विखे-पाटील

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



अकोले व संगमनेर तालुक्यातील सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी. या दोन्ही तालुक्यातील सिंचन क्षेत्र वाढावे यासाठी सिंचन प्रकल्प व योजनांच्या कामांचे सर्वेक्षण करून याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अकोले मतदारसंघातील जलसंपदा विभागातील (पान ३ वर)

■ या बैठकीत आमदार डॉ. किरण लहामटे आणि आमदार अमोल खताळ यांनी उपस्थित केलेले विविध मुद्दे व कामांचा आढावा घेण्यात आला. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व कामे प्राधान्याने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी या कामाचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार कालबद्ध पद्धतीने कामे पूर्ण करावीत, अशा सूचनाही जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी यावेळी दिल्या.

# अल्पवयीन मुलीला पळवून अत्याचार करणाऱ्याला बेड्या

**नायक वृत्तसेवा, शेवगाव**

लग्नाचे आमिष दाखवून मुलीला पळवून नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याच्या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आकाश सोमनाथ गिरम (वय २५, रा. शहर टाकळी ता. शेवगाव) असे या आरोपीचे नाव आहे.

याबाबत पीडित मुलीच्या आईने शेवगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपी आकाशने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीस प्रेमाच्या जाळ्यात ओढून लग्नाचे आमिष दाखवून १ जून रोजी पळवून नेले. त्यानंतर आरोपी काम करीत असलेल्या भातकुडगाव येथील हॉटेल जगदंबा येथे आरोपी मुलीला घेऊन गेला. तेथे त्याने तिला चार दिवस ठेवले.

दरम्यान, पीडित मुलीची आई तक्रार देण्यासाठी शेवगाव पोलिस ठाण्यात जाणार असल्याचे समजताच आरोपीने पीडितेला ४ जून रोजी दुपारी १ वाजता शेवगाव पोलीस स्टेशनच्या आवारात आणून सोडले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध पोक्सोसह इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांनी या गुन्ह्यातील आरोपीचा (पान ३ वर)

# पेरण्यांची घाई नको; पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषि विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी, मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी पाऊस, पीक पाणी, धरणाच्या जलाशयातील पाणी साठा आदीचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातील पीक पाणी, पेरण्या, खते पुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यातील सर्व भागात पंधरा जूनला मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून (पान ३ वर)

■ राज्यातील सर्व प्रमुख धरणात गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याचे मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगण्यात आले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर म्हणाले, गेल्या वर्षीचा साठा - गोसीखुर्द ४.६४ टीएमसी (८.६७), तोतलाडोह १८.७९ (१८.१४), ऊर्ध्व वर्धा ८.८५ (८.८७), जायकवाडी २२.६०(२.९९), मांजरा १.६३(०.००), ऊर्ध्व तापी हातनूर ५.३२(२.६३), गंगापूर २.५०(२.४८), कोयना १७.३६(१०.००), खडकवासला ०.८४(१.०३), उजनी १८.७२(०.००), भातसा ९.९५(८.१७), धामणी ३.११(१.७७).

# मेंढपाळाच्या पालावर सशस्त्र दरोडा!

## मारहाणीत चौघे जखमी; दागिन्यांसह रोकड पळवली

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

नगर तालुक्यातील विळद शिवारात असलेल्या नारुंडी तलावाजवळील मेंढपाळाच्या पालावर मंगळवारी पहाटेच्या सुमारास ७ ते ८ सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा टाकत चौघांना बेदम मारहाण केली. तसेच सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लुटून नेली. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरोडेखोरांच्या मारहाणीत लक्ष्मण विठ्ठल सूळ, प्रकाश लक्ष्मण सूळ, सुमन लक्ष्मण सूळ आणि शीतल पोपट होडगर हे जखमी झाले असून, त्यांच्यावर नगरमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

एमआयडीसी पोलिस ठाण्यात याप्रकरणी पोपट बन्सी होडगर यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत म्हटले आहे, फिर्यादी होडगर व त्यांचे मेव्हणे लक्ष्मण सूळ हे विळद जवळील पिंप्री घुमट येथील रहिवासी असून ते मेंढपाळ आहेत. त्यांचा मेंढ्यांचा तळ विळद शिवारातील नारुंडी तलावाजवळ होता. फिर्यादी व इतर सर्वजण सोमवार दि. ९ जून रोजी रात्री जेवण करून मेंढ्यांच्या तळावर पालात झोपलेले होते. मंगळवार दि.१० जून रोजी मध्यरात्री १.२० च्या सुमारास काळे कपडे घातलेले ७ ते ८ अनोळखी दरोडेखोर हातात काठ्या व चाकू घेवून त्यांच्या (पान ३ वर)












# संपादकीय

सुविचार : शिक्षण हे असे सामर्थ्यशाली शस्त्र आहे, ज्या अस्त्राच्या वापराने तुम्हाला सारे जग बदणे शक्य होऊ शकते. – नेल्सन मंडेला

## नसत्या उठाठेवी

कमल हसन हे भारतीय चित्रपटसृष्टीतील कसदार अभिनयासाठी प्रसिद्ध असणारे कलाकार म्हणून ओळखले जातात. अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती, अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रभावी कामगिरी करणाऱ्या कमल हासन यांनी काही वर्षांपूर्वी राजकारणाच्या क्षेत्रातही प्रवेश केला. दक्षिणेतील सुपरस्टार असल्याने त्यांनी तीच आपली राजकीय कर्मभूमी म्हणून निश्चित केली. राजकारणात प्रवेश करताना स्वत: द्रविडी राजकारणापासून दूर राहणार असल्याची हमी हसन यांनी दिली होती. पण तमिळ अस्मितेबाबत कट्टर असलेल्या पक्षाशी त्यांनी जवळीक साधली. पुढे तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना खूश करत राज्यसभेची जागा घेतली. राजकारणाच्या क्षेत्रात जराही जम बसवता न आलेल्या हसन यांनी अकारण वादग्रस्त वक्तव्ये करुन वाद निर्माण करण्याचा प्रयत्न मात्र निश्चितपणे केला. पण ही बाब त्यांच्या देशभरातील चाहत्यांच्या पचनी पडली नाही. अलीकडेच चेन्नईत नव्या चित्रपटाच्या प्रमोशनच्या वेळी दिलेल्या एका मुलाखतीत दक्षिण भारतातील भाषांबाबत बोलताना त्यांनी कन्नड भाषेचा संदर्भ घेतला आणि कन्नड भाषेचा जन्म हा तमिळ भाषेतूनच झाल्याचे विधान केले. विशेष म्हणजे कमल हसन यांनी हे वक्तव्य प्रसिद्ध कन्नड अभिनेते शिवा राजकुमार यांच्या उपस्थितीत केले. शिवा राजकुमार हे कन्नड अभिनेते दिवंगत डॉ. राजकुमार यांचे चिरंजीव असून त्यांनी १९८० च्या दशकांत गोकाक भाषिक आंदोलनाचे नेतृत्व केले होते. गोगाक आंदोलनाला कर्नाटकच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कन्नड भाषेला पहिली भाषा म्हणून दर्जा द्यावा या मागणीसाठी आंदोलन पुकारण्यात आले होते. हा इतिहास माहीत असूनही हसन यांनी हे विधान केले. साहजिकच, त्यांच्या या विधानामुळे कन्नड प्रेमींमध्ये संताप उसळला. सोशल मीडियावर त्यांच्यावर टीकेची झोड उठली. प्रादेशिक अस्मिता आणि भाषिक स्वाभिमान यावर घाव बसल्याचे अनेकांनी म्हटले. काही संघटनांनी तर 'ठग लाइफ' चित्रपट कर्नाटकमध्ये प्रदर्शित होऊ देणार नाही असे खुलेआम जाहीर केले. कर्नाटकचे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी या विधानाचा निषेध केला. सध्या कावेरी पाणी वाटप मुद्यावरून कर्नाटक आणि तमिळनाडू यांच्यातील संबंध ताणलेले असताना कमल हसन यांनी अशा प्रकारचे वाद निर्माण करणारे वक्तव्य टाळायला हवे होते. शिवाय दोन्ही राज्ये भाषेच्या अस्मितेवरून सजग आणि संवेदनशील आहेत. अशा वेळी एखादे वादग्रस्त विधानही आगीत तेल ओतणारे ठरू शकते, हे हसन यांच्यासारख्या अभ्यासू व्यक्तीला माहीत असणे आवश्यकच होते. तरीही त्यांनी जोखीम उचलली. या प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयानेही कमल हासन यांची कानउघाडणी केली आहे. तुम्ही कमल हासन असाल, पण त्यामुळे तुम्हाला कोणीही व्यक्ती किंवा समुदायाच्या भावना दुखावण्याचा अधिकार मिळत नाही, अशी स्पष्ट टिप्पणी न्यायालयाने केली आहे. ही टिप्पणी महत्त्वाची होती. कारण ती 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'सामाजिक जबाबदारी' यामधील सीमारेषा स्पष्ट करते. कोणतीही व्यक्ती, विशेषतः स्टारडम किंवा जनसामान्यांत लोकप्रिय असणाऱ्या व्यक्तंनी आपल्या वक्तव्याने जनतेच्या भावना दुखावणार नाहीत याची खबरदारी घेणे अपेक्षित असते. कमल हासन यांनी या प्रकारानंतर 'ठग लाइफ' चित्रपटाचे कर्नाटकमधील प्रदर्शन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. वस्तुतः, त्यांनी कोणताही औपचारिक माफीनामा दिलेला नसला, तरी हा निर्णय एक प्रकारची सामाजिक समेटाची भूमिका म्हणता येईल. वादग्रस्त वक्तव्य करण्याची कमल हसन यांची पहिलीच वेळ नाही. यापूर्वी देखील त्यांनी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्या हिंदी विरोधी भूमिकेचे समर्थन केले आणि हिंदी भाषिक लोकांच्या भावना दुखावणारे वक्तव्यही केले होते. कमल हसन यांनी २०१८ मध्ये पक्ष मक्कल निधी मय्यमची स्थापना केली आणि यानुसार त्यांनी दोन निवडणुकाही लढल्या. पण अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र २०२१ मध्ये तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत कमल हसन यांच्या पक्षाने प्रमुख मतदारसंघातील मते घेण्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले. इथेच द्रमुकने कमल हसन यांच्याशी संधान साधण्यास सुरुवात केली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दोन्ही पक्षात आघाडी झाली. आता कमल हसन यांचा पक्ष हा द्रमुक आघाडीत असल्याने कमल हसन हे पुढील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत आघाडीचे स्टार प्रचारक राहू शकतात.कमल हसन यांना तमिळ जनतेतील तमिळ भाषेविषयी असणारी आत्मियता आणि भाविनिक श्रद्धा चांगलीच ठाऊक आहे. या कारणामुळेच त्यांनी चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने आयोजित सभेत भाषणाची सुरुवात 'उईरे उरावे तमीज' ने (माझे आयुष्य माझे कुटुंब तमिळ आहे) केली. इथपर्यंत ठिक. परंतु यानंतर त्यांनी भाषेचा इतिहास न पाहता तसेच कन्नड लोकांच्या भावनांचा विचार न करता केवळ तमिळ लोकांना खूश करण्यासाठी कन्नड अभिनेत्यासमोर तमिळ भाषेचे गुणगाण गायले आणि कन्नड भाषेला कमी लेखले. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे, पण तो समाजातील इतर घटकांच्या भावनांचा आदर करत वापरणे आवश्यक आहे. कमल हसन जेव्हा राजकारणात आले, तेव्हा त्यांच्याकडे जबाबदार व्यक्तिमत्व म्हणूनच पाहिले गेले. पण अशा प्रकारची वादग्रस्त वक्तव्ये करुन त्यांना काय मिळते, हे तेच जाणोत ! पण या वक्तव्यांमुळे आपली गणना देशातील सुमार व बेताल वक्तव्ये करणाऱ्या नेत्यांमध्ये केली जात आहे, हे निश्चित.

## भ्रष्टाचाराचा पायाच विवाह सोहळ्यात






राज्यात वैष्णवी हगवणे यांच्या आत्महत्येनंतर मोठया प्रमाणावर लग्नावरील उधळपट्टी, हुंडा यावर चर्चा सुरू झाली. राज्यात हुंडयासंदर्भाने कायदा असूनही हुंडयाची देवाणघेवाण होते आहे. त्याची कदाचित सार्वजनिक स्वरूपात चर्चा होत नसेल, मात्र हुंडा दिला जातो आणि घेतला जातो यावर शिक्कामोर्तब झाले आहे. कधीकाळी रेडिओ, भांडे, सायकल, अर्धा एक तोळ्याची सोन्याचीअंगठी घेतली जात होती, मात्र आता हुंडा घेण्याच्या रक्कमेचे आकडे, सोन्याच्या तोळ्यांचे आकडे, महागडया गाड्या, फ्लॅट यासारख्या गोष्टी आता हुंडयात दिल्या जाऊ लागल्या आहेत. दिल्या जातात असे नाही तर मागितल्या जातात मुलींच्या पालकांना नाईलाज म्हणून द्यावा लागतो. आर्थिक श्रीमंतीचा स्तर उंचावतो आहे आणि त्याप्रमाणात हुंडयाचे आकडे उंचावता आहेत इतकच. मात्र हुंडा घेण्याबरोबर लग्न देखील मोठया प्रतिष्ठेच्या मार्गाने करावे लागते आहे. त्यासाठीलाखो रूपये खर्च होता आहेत. माणसांचे माणसांसोबतचे असणारे नाते हरवत चालले आहे. माणसांना प्रेमाची भूक लागण्याऐवजी पैसा, संपत्ती आणि प्रतिष्ठेची भूक लागली आहे. या भूकेतून आत्महत्या, हत्या, छळ होताना दिसतो आहे. अशा पार्श्वभूमीवर राज्यात मराठा समाजातील धुरिणांनी पुढे येत मराठा समाजातील मुलामुलींचे लग्न करताना काही नियम पाळावेत म्हणून आचारसंहिता जारी केली आहे. या आचारसंहितेचे पालन झाले तर महाराष्ट्राचे सामाजिक चित्र पालटलेले अनुभवता येईल. ती वाट उद्यासाठी अधिक प्रकाशमय असेलम्हणून केवळ मराठा समाजाने नाही, तर अवघ्या महाराष्ट्रातील सर्व जाती, धर्माच्या लोकांनी या दिशेने प्रवास करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे.

मराठा समाजाच्या कर्त्या लोकांनी एकत्रित येऊन समाजात जे काही घडते आहे.ज्या चुकीच्या पाऊलवाटा निर्माण होता आहेत त्याबददल चिंतन करत, समाजाला वाईट परंपरेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी खरंतर त्या कर्त्या लोकांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. हे घडत असताना सामान्य लोकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यामुळे समाजमनात परिवर्तनाचा विचार होताच, मात्र सामान्यांना आवाज नसतो. त्यामुळे समाजातीलकर्त्यां लोकांनी भूमिका घेतली की, सामान्य माणसं चांगल्या गोष्टींच्या मागे उभे राहतात हा सामाजिक अनुभव आहे. मुळात सामान्य माणसांच्या शहाणपणावर नेहमीच विश्वास ठेवावा इतकेशहाणपण त्यांच्याकडे निश्चित असते. या निमित्ताने मराठा समाजाच्याच नव्हे तर समाजातील विविध जाती, धर्मात केल्या जाणा–या विवाह सोहळ्यावर लाखो रुपयांच्या उधळपट्टी केली जाते आहे. हे सारे दुर्दैवाने उघडे डोळ्याने पाहिले जात आहे. त्यावर सरकार काही बोलत नाही. राज्यकर्त्यांची हाताची घडी तोंडावर बोट अशी भूमिका आहे. उलट समाजातील एक वर्ग आपल्या कुटुंबातील विवाह सोहळे अधिक देखणे व्हावेत म्हणून अधिकाधिक प्रयत्न करता आहेत. त्यासाठी लाखो रूपये उधळले जाता आहेत. यातून संपत्तीचे ओंगळवाणे दर्शन घडवले जाते आहे. त्यासंदर्भाने आचारसंहिता जाहीर करताना या उधळपट्टीवर लगाम घालण्याचा निर्णय घेतला गेला आहे. मुळात विवाह सोहळे यांचे एक आर्थिक गणित आहे. त्यावर जणू अनेकांचे व्यवसाय टिकून आहे आणि त्यातूनच सावकारी टिकून आहे. हे सारेच गणित समजून घेतले तर तोंडात बोट घालावे असेच आहे.

वैष्णवी हगवणेंच्या हुंडाबळीनंतर समाजातील लग्नसमारंभाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. समाजात गेल्या काही वर्षांमध्ये लग्नात प्रचंड उधळपट्टी केली जाते आहे. अर्थात काहीजण श्रीमंती दाखवण्याठी हे सारे करता आहेत. लग्न हा एक कौटुंबिक आणि धार्मिक विधी आहे. तो संस्कार म्हणूनच पुढे घेऊन जाण्याची गरज आहे. त्याचवेळी विवाह सोहळ्याच्या निमित्ताने परिवर्तनाची गरज आहेच. मात्र हे परिवर्तन विवेकी असायला हवे, दुर्दैवाने हे परिवर्तन चुकीच्या दिशेनेच घडते आहे. गेले काही वर्ष प्री वेडिंग शूट, डेस्टिनेशन वेडिंग, रिसॉर्ट वेडिंग, थीम वेडिंग, संगीत पार्टीचा कार्यक्रम, अलिकडे विवाह सोहळ्यात आर्केस्टा सारखे कार्यक्रमाचे आयोजन केले जाते आहे. अशा आपल्या विवाह संस्कारत नसलेल्या अनेक गोष्टींचा समावेश आधुनिकतेच्या नावाखाली केला जात आहे. या गोष्टींचा संस्काराशी,मूल्यांशी, भविष्याशी काही तरी संबंध आहे का ? या गोष्टींमुळे समाजाचे काय भले होणार आहे ? यातून कोणाच्या सुख, समाधान, आनंदात भर पडणार आहे का ? याचा विचार करण्याची गरज आहे. यासाठी मुलीच्या आईबाबांना लाखो रूपये खर्च करावे लागता आहेत. जवळच्या एखाद्या नातेवाईकांने लग्नात पैसे खर्च करून कार्यक्रम केला म्हणून इतरही त्यामार्गाने जातात. अनुकरणाची वाट चालत असताना खरंच ते अनुकरणाने कुटुंबाचे, समाजाचे काही भले होणार आहे का ? याचा विचार न करता केवळ चित्रपटासारखे प्रदर्शन करण्यात लोकांना आनंद वाटतो आहे. मात्र हे सारे करताना त्याचे सादरीकरण लग्न सोहळ्यात केले जाते आहे. खरंतर यातील अनेकदा केले जाणारे शुट संस्कृतीचा विचार न करता ओंगळवाणे स्वरूपात सादर केले जात असते आणि ते पाहणे देखील नकोसे होते. हे सारे लग्नाच्या गर्दीसमोर सादर केले जाते. आता नव्याने घोषित केलेल्या आचारसंहितेत असे करू नये आणि केले तर किमान दाखवू नये असा विचार पुढे आला आहे. त्यामुळे आपले व्यक्तिगत जीवन दर्शनीय असावे. ते प्रदर्शनीय होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. हा सारा प्रवास घडत असताना आपण लाखो रूपयाची उधळपटटी करत असतो. यातून नेमके काय साध्य होते ? याचा विचार करायला हवा. मुळात ज्यांची आर्थिक परीस्थिती आहे ते लोक या मार्ग अनुसरण करतात, मात्र काहीजण ऐपत नसतानाही समाजाला दाखवता यावे यासाठी हा सगळा मार्ग अनुसरतात. काही वेळा तर यासाठी मुलीकडील मंडळीकडून पैसे उकळले जातात. अनेकदा हा सर्व खर्च नवरीच्या मंडळींकडून होईल याची वराकडील मंडळी पुरेपुर काळजी घेताना दिसेतात.

लग्नाच्या निमित्ताने महानगरे आणि शहरे यांची तुलना केली, तर हा खर्च न परवडणारा आहे. शेवटी आपल्याला समाजाकडून प्रतिष्ठेसाठीच हे सारे करायचे असेल, तर परीस्थिती नसताना देखील वाट चालावी लागणार आहे, तरभ्रष्टाचाराचा मार्ग अनुसरला जाणार हे निश्चित आहे. मुळात अलिकडे लग्नांच्या निमित्ताने होणारे प्रदर्शन पाहिले की, हे सारे एखादी मध्यमवर्गीय व्यक्ती हे सारे करू शकेल अशी परीस्थिती नाही, मात्र प्रतिष्ठा आणि त्यासाठीचा असलेला सामाजिक दबाव म्हणून हे मार्ग अनुसरणे घडते आहे. माणसं खोटया प्रतिष्ठेच्या मागे धावत असतात. सध्या आपल्या राज्यातील महानगरे आणि ग्रामीण भागातील लग्न सोहळ्यातील विविध खर्चावर नजर टाकली आणि ही आर्थिक उलाढाल पाहिले, तर तोंडात बोट घालावे अशी परीस्थिती आहे. साधारणपणे प्री–वेडिंग शूटसाठी ५० हजार ते ५ लाख रूपये मोजावे लागता आहेत. लग्नासाठी, साखरपुडयासाठी, हळदीसाठी लागणारा हॉलचा खर्च –१ लाख ते १० लाखापर्यंत येतो. अर्थात हा खर्च तर यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहेत. आपल्या प्रतिष्ठेसाठी हे करावे लागणार असल्याने त्यात तडजोड होताना दिसत नाही. जेवणाचा खर्च – ६ लाख ते १४ लाख रूपये येतो. त्यात उपस्थितांची गर्दी किती होते यावरच ते अवलंबून असणार आहे. डेस्टिनेशन वेडिंग –१५ लाख ते ५० लाख, रिसॉर्ट वेडिंग – १८ लाख ते २५ लाख, फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी – २ लाख आणि बस्ता, मानपान – ३ लाख ते १० लाख इतका खर्च साधारण स्वरूपात येतो. आता हा खर्च विशेषता मुलींच्या लोकांना न परवडणारा असतो. मुलांच्याकडील लोकांना तो हवा असतो. आपल्या मुलींच्या कल्याणासाठी मातापिता हा खर्चाचा बोजा पेलत असतात. मुलीच्या आयुष्यातील उद्याचा दिवस अधिक सुखमय असावा म्हणून ही केलेली तडजोड केली जात असते. मात्र हा होणारा खर्च नवरीकडच्या मंडळींना कर्जात टाकणारा असतो. जीवनभर जे कमवले ते गमवणे जसे घडते आहे त्याप्रमाणे काढलेल्या कर्जाचे हप्ते भविष्यात भरण्यासाठी देखील त्या मातापित्यांचे आयुष्य खर्च होत असते. ग्रामीण भागात अनेकदा शेती विकण्याचा प्रयत्नही पालक करतात आणि त्यातून लग्नाचा सोहळा पार पाडला जातो. यातील किती खर्च योग्य ठरेल याचा विचार करण्याची गरज आहे. नव्या आचारसंहितेत १००–२०० लोकांची उपस्थिती असावी असे म्हटले आहे. तसे घडले तर जेवणाचा खर्च, मानापानाचा, हॉलचा खर्चात मोठया प्रमाणावर कमी होऊ शकेल. कोरोनाच्या काळात लग्नाची उपस्थिती देखील ५० लोकांची होती. त्या वाटेने आपला प्रवास झाला तर बरेच काही साध्य होऊ शकेल. त्यामुळेत्यासंदर्भाने गंभीर विचार करण्याची गरज आहे. हुंडा म्हणून रोख रक्कम आणि मागितले जाणारे सोने हे लाखोंच्या घरात असल्याचे सांगण्यात येते आहे. समाजात भपकेबाज लग्न आणि हुंडापद्धतीमुळे निष्पाप विवाहितांचे हुंडाबळी जाऊ लागलेत. वाढत्या हुंडाबळीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आतासमाजातील धुरिणींनी हुंडा पद्धतीला लगाम घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी आचारसंहिता लागू करावी अशी सूचना समोर आली आहे. त्यादृष्टीने त्यांनी जाहीर केलेल्या आचारसंहितेत लग्नात नवरीकडून हुंडा घेऊ नका. मुलामुलीच्या लग्नासाठी कर्ज काढू नका. प्री वेडिंग बंद करा. मुलीच्या नावे मुदत ठेव करा. साखरपुडा, हळदी, लग्न एकाचदिवशी करा. पाच पदार्थाचे मराठमोळे जेवण ठेवावे. लग्न सोहळ्याला १०० ते २०० लोकंच बोलवा. लग्नात डिजे, बँण्डऐवजी पारंपारिक वाद्ये ठेवा अशा सूचना करण्यात आल्या आहेत. लग्न हा संस्कार आहे त्याचे स्वरूप आहे तसेच राहिल याची काळजी घ्यायला हवी. आज ही भपकेबाज लग्न पाहिले की मुलीच्या बापाची झोप मोडते आहे. त्यातून त्याच्या जीवाचा घोर वाढतो आहे आणि अशा आत्महत्या पाहिल्या की, त्याची काळजी जीवनभर वाढतच जाते. त्यामुळे या आचारसंहितेच्या निमित्ताने पावले पडतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. कोणी तरी एकाने पाऊल टाकले की, भविष्यात त्या मार्गाचा महामार्ग बनल्याशिवाय राहणार नाही. महात्मा फुले यांच्या पहिल्या शाळेत केवळ सहा मुली होत्या. आज देशात मुलींची संख्या आश्चर्यकारक दिसते आहे. त्यामुळे आज आचारसंहितेची असलेली अरूंद वाट उद्या निश्चित रूंदावेल यात शंका नाही.

मराठा समाजाने हे टाकलेले पाऊल आदर्शाची वाट आहे. अर्थात हे केवळ मराठा समाजात घडते आहे असे नाही, तर समाजातील सर्व जाती–धर्मांच्या लोकांच्या विवाह प्रथेमध्ये याच पाऊलवाटा चालल्या जाता आहेत. त्यामुळे मराठा समाजाच्या धुरिणोंनी आचारसंहितेचा विचार करत नव्या वाटा चालण्याचा जो प्रयत्न केला आहे त्याच वाटाच सर्व समाजाने चालण्याची गरज आहे. यात समाजाचे हित आहे. काल वैष्णवीचा बळी गेला आहे, त्या वाटेने समाजातील कोणत्याही मुलीचा बळी जाऊ नये. त्याच बरोबर लग्न सोहळा जेव्हा पार पडत असतो तेव्हा दोन कुटुंबामध्ये नात्याचा बंध बांधला जात असतो. त्या बंधात प्रेम, जिव्हाळा, ममत्वाचा धागा असायला हवा. मुळात दोन्ही कुटुंबात हे घडणार नसेल तर तो संस्कार कसा ? त्याचबरोबर नातेच बांधणे घडत नसेल तर तो व्यवहार ठरण्याची शक्यता आहे. विवाह सोहळ्याचा संस्कार ठरेल तर जीवनाच्या नव्या वाटा निर्माण होऊन समाजाचे उत्थान घडेल अन्यथा हा सारा व्यवहारच राहण्याची शक्यता आहे.

## यंदाचा जून 'परंपरा' राखणार का?

**सरलेल्या मे महिन्यामध्ये प्रचंड आव्हानात्मक स्थितीतही भारतीय शेअर बाजारात वृद्धी दिसून आली आणि सलग तीन महिने तेजीचे निशाण फडकावत 'हॅटट्रीक'ही नोंदवली गेली. तथापि, जून सिरीजची सुरुवात घसरणीने झाली आहे. ट्रम्प यांचे टेरीफअस्त्र आणि भारताचे जीडीपीचे आकडे यांचा परिणाम चालू आठवड्यात दिसून येणार आहे. गेल्या १७ वर्षांत (२००८–२०२४), निफ्टीने जून महिन्यात १० वेळा सकारात्मक आणि ७ वेळा नकारात्मक परतावा दिला आहे. सकारात्मक महिन्यांमध्ये सरासरी वाढ ३.९७ टक्के राहिली; तर नकारात्मक महिन्यांमध्ये सरासरी घसरण ३.८० टक्के इतकी होती. या पार्श्वभूमीवर यंदाचा जून महिना कसा राहणार हे पाहणे औचित्याचे ठरेल.**

जगातील चौथी अर्थव्यवस्था बनलेल्या भारताच्या शेअर बाजारासाठी मे २०२५ हा महिना तेजीची परंपरा कायम ठेवणारा ठरला. विशेष म्हणजे सलग तीन महिने भारतीय शेअर बाजाराने तेजीची पताका फडकावत ठेवली आहे. यामुळे गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झ्ले आहे. मे महिन्यामध्ये शेअर बाजारातील दोन प्रमुख निर्देशांक ह्न असणाऱ्या निफ्टी आणि सेन्सेक्स मध्ये जवळपास दोन टक्क्यांपर्यंतची वाढ नोंदली गेली. उल्लेखनीय बाब म्हणजे, मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्ये अधिक तेजी दिसून आली. यामुळे संपूर्ण बाजारात उत्साही वातावरण निर्माण झाले. निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकामध्ये मे महिन्यात ६.१ टक्क्यांची वाढ नोंदली गेली आहे; तर निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांकाने तर तब्बल ८.७ टक्क्यांची झेप घेतली. या जबरदस्त कामगिरीमुळे काही प्रमुख निर्देशांकांनी वर्षाच्या सुरुवातीच्या दोन महिन्यांत झालेल्या नुकसानीवर मात करत स्थैर्य प्राप्त केले आहे. भारतीय शेअर बाजाराचे एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅप) मे महिन्यात १९.४ लाख कोटी रुपयांनी वाढून ४४५.५ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये बाजाराने एकूण ५८ लाख कोटी रुपयांचे नुकसान अनुभवले होते. मात्र मार्च महिन्यापासून सुरू झालेल्या जोरदार सुधारणामुळे आता बाजाराने ६१ लाख कोटी रुपयांची वाढ पुन्हा प्राप्त केली आहे. या तेजीत संस्थागत गुंतवणूकदारांचा महत्त्वाचा वाटा आहे. विशेषतः विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सुमारे २०,००० कोटी रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी तर एफआयआयच्या दुपटीहून अधिक म्हणजे ४७,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक भारतीय शेअर बाजारात केली आहे. या भरीव संस्थात्मक खरेदीमुळे बाजारात स्थैर्य निर्माण झाले असून, आगामी काळातही सकारात्मक दिशेने वाटचाल होण्याची शक्यता आहे. येत्या काळात जागतिक घडामोडी, निवडणूकांचे निकाल आणि व्याजदर धोरण यांवर बाजाराची दिशा अवलंबून राहणार आहे.

गतसप्ताहात जून सीरिजच्या पहिल्याच दिवशी बाजार घसरणीसह बंद झाला. सेन्सेक्स १८२ अंकांनी घसरून ८१,४५१ वर तर निफ्टी ८३ अंकांनी घसरून २४,७५१ वर बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक जवळपास स्थिर बंद झाले. मात्र, निफ्टी बँक निर्देशांकाने काहीशी वाढ दर्शवली. ३० मे रोजी सर्वाधिक तेजी सरकारी बँकांच्या शेअर्समध्ये दिसून आली. त्याचवेळी मेटल, आयटी, ऑटो, तेल–गॅस या क्षेत्रांमध्ये विक्रीचा दबाव राहिला.

सद्यस्थितीत निफ्टीसाठी २४,९०० हा महत्त्वाचा अडथळा ठरत आहे. निफ्टीने हा स्तर पार केल्यास बाजारात चांगली तेजी येण्याची शक्यता आहे. २५,०२५ च्या वर बाजारात जोरदार शॉर्ट कव्हरिंग येऊ शकते. निफ्टीने २१,८०० च्या नीचांकी स्तरापासून सुमारे १४% वाढ दाखवली आहे. आता निफ्टीने जर २५,१०० चा ब्रेकआउट केला, तर २५,५०० पर्यंत हा निर्देशांक झेप घेऊ शकतो.

बँक निफ्टीचा विचार करता येणाऱ्या काळात बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये खरेदीचा जोर असाच राहिल्यास हा निर्देशांक ५६,५५० ते ५६,८०० पर्यंत झेपावू शकतो. निफ्टीच्या तुलनेत बँक निफ्टीमध्ये अधिक चांगली 'बार्गेनिंग पॉवर' दिसत आहे. संस्थागत गुंतवणूकदारांकडून होणारा गुंतवणूक प्रवाह सध्या बाजाराला आधार देत आहे. भारताच्या विदेशी गंगाजळीत एका आठवड्यात ७ अब्ज डॉलर्सने झालेली वाढ उत्साह वाढवणारी आहे.

भारताचा चौथ्या तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर ७.४% इतका नोंदवला गेला असून तो बाजाराने अपेक्षित धरलेल्या ६.७% या अंदाजांपेक्षा जास्त आहे. संपूर्ण आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी ही वाढ ६.५% इतकी राहिली आहे. जगभरात आर्थिक वाढीबाबत चिंता कायम आहे. यामागे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत घसरण झाली आहे. यामुळे फेडरल रिझर्व्हच्या भविष्यकालीन धोरणात्मक निर्णयांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. चालू आठवड्यात व्याजदरकपातीच्या वाढत्या शक्यतांचा बाजारावर प्रभाव राहील. याशिवाय, मासिक ऑटो विक्री आणि व्हॉल्युम डेटा जाहीर होणार असल्याने ऑटोमोबाईल क्षेत्रातील समभागांवर लक्ष ठेवून राहावे लागेल.

अमेरिकेतील एका न्यायालयाने ट्रम्प सरकारच्या जुन्या टॅरिफ नियमांना हिरवा कंदिल दाखवल्यामुळे टेरीफचे संकट पुन्हा घोंगावू लागले आहे. ट्रम्प यांनी ४ जूनपासून स्टील आणि ॲल्युमिनियमवरील आयात शुल्क दुप्पट करून ५० टक्के करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे भारतीय निर्यातीवर थेट परिणाम फारसा होणार नसला तरी जागतिक स्तरावर मागणी कमी झाल्यास किंमती आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. या निर्णयामुळे मेटल स्टॉक्समध्ये अस्थिरता दिसून येऊ शकते. बँकिंग, ऑटो, रिअल इस्टेट ही क्षेत्रे सध्या सकारात्मक दिसताहेत.

चालू आठवड्यात प्रामुख्याने दोन घडामोडींबाबत बाजार कसा प्रतिसाद देतो यावर पुढची दिशा अवलंबून असणार आहे. पहिली घडामोड म्हणजे भारताच्या जीडीपीचे आकडे. याबाबत चालू तिमाहीतील वाढीकडे सकारात्मकतेने पहायचे की गेल्या चार वर्षांतील नीचांकी पातळी म्हणून पाहिले जाणार यावर बाजाराची दिशा ठरेल. दुसरी घडामोड आहे, ट्रम्प यांच्या घोषणांची. स्टील व ॲल्युमिनियमवर टेरीफ लादण्याचा निर्णय घेतल्यानंतर ट्रम्प यांनी भारत–पाकिस्तानबाबत केलेल्या वक्तव्यांत २६ जूनपर्यंत भारत–अमेरिका यांच्यातील करार पूर्णत्वास जाऊ शकतो, असेही म्हटले आहे. ही बाब सकारात्मक आहे. भारत यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. पण यातील संदिग्धता आणि दृष्टिकोनातील फरक यामुळे बाजारात चालू आठवड्यात पुन्हा एकदा घुसळण दिसू शकते.

समभागांचा विचार करता स्टील आणि ॲल्युमिनियम क्षेत्रातील समभाग सध्या टाळणे योग्य राहील. ईएलजीआय इक्विपमेंटसचा समभाग ५८० चे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. पिरॅमल एंटरप्रायजेसचा समभाग ११३० रुपयांचे लक्ष्य आणि १०९५ चा स्टॉपलॉस ठेवून खरेदी करता येईल. अंबुजा सिमेंटचा समभाग ५५५ रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. पुनावाला फिनकॉपचा समभाग ४२० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. पीएनबीचा समभाग ११८ रुपयांचे लक्ष्य आणि १०३ चा स्टॉपलॉस ठेवून खरेदी करता येईल. एसबीआयच्या समभागात घसरणीच्या काळात खरेदी करुन ८४० च्या मध्यमकालीन लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल.

चालू आठवड्यात बाजारात घुसळण दिसू शकते. त्यामुळे बाजाराचा कल आणि आपली जोखीम क्षमता पाहून रणनीती ठरवा. स्टॉपलॉसचा वापर करतानाच वेळोवेळी आपला नफा बुक करायला विसरु नका.

**– संदीप पाटील,**
**शेअर बाजार अभ्यासक**

## पान १ वरुन

**शौचास जाण्याच्या कारणावरुन विवाहितेचा खून!**

साडेसहाच्या सुमारास तालुक्याच्या पठारभागातील कर्जुलेपठार येथे घडला. या प्रकरणातील फिर्यादी अजित दादाभाऊ वाघ हा आपले वडील दादाभाऊ किसन, आई मंजुळा, पत्नी कविता, भाऊ ज्ञानदेव, त्याची पत्नी रुपाली व बहिण मोनिका असे एकत्रितपणे गावातील मुरलीधर रामकृष्ण पडवळ याच्या घराशेजारी राहतात. वाघ यांच्या घरात शौचालय नसल्याने त्यांच्या कुटुंबातील सदस्य आसपासच्या माळरानासह पडवळ यांच्या गावालगतच्या शेतजमीनीचाही त्यासाठी अनुधनमधून वापर करीत असतं. त्याप्रमाणे नेहमीनुसार मंगळवारी (ता.१०) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास रुपाली वाघ पडवळ यांच्या शेतात शौचास गेल्या होत्या.

त्यावेळी वाटेत विक्रम मुरलीधर पडवळ याने त्यांना आमच्या शेतात शौचास का जाता? असा प्रश्न करीत शिवीगाळ केली. घडला प्रकार त्यांनी घरी येवून सांगितल्यानंतर रात्री आठच्या सुमारास वाघ कुटुंबातील वरील मंडळी पडवळ यांच्या घरी जावून घडल्याप्रकाराबाबत दिलगिरी व्यक्त करीत असतानाच विक्रम पडवळ अचानक आवेशात आला. त्यावेळी तेथे हजर असलेल्या मुरलीधर व अलका पडवळ यांनीही शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. या दरम्यान फिर्यादी व त्याचे कुटुंबिय वारंवार ‘आमच्याकडून चूक झाली, आम्ही माफी मागतो, तुम्ही म्हणाला तर रुपाली वहिणींनाही माफी मागण्यास सांगतो..’ अशा विनवण्या करीत होते. मात्र रागाच्या ज्वाळांनी ग्रासलेल्या पडवळ कुटुंबाने त्याकडे दुर्लक्ष करीत औदसेला आमंत्रण दिले. आपल्या मुलाचा आवेश पाहून बापानेही फिर्यादींना उद्देशून जातीवाचक शिवीगाळ करीत विक्रमच्या रागाग्नीत तेल ओतले.

त्याचा भडका उडून ‘आज तुम्हाला जिवंतच सोडीत नाही’ अशी गर्जना करीत विक्रम पडवळ तडक घरात धावला आणि काही क्षणात धारदार चाकू घेवून आला. त्यावेळी त्याची पत्नी अलकाने सायंकाळी शौचास गेल्यावरुन वाद झालेल्या रुपाली वाघ या २८ वर्षीय विवाहितेचे दोन्ही हात धरले आणि विक्रमनेही कोणताच विचार न करता हातातला चाकू थेट तिच्या पोटात खुपसला. आपल्या वहिणीवरील चाकूहल्ला पाहून तिच्या मदतीला धावलेल्या नणंदेवरही त्याने वार केल्याने त्यात मोनिका वाघ ही तरुणीही गंभीर जखमी होवून रक्ताच्या थारोळ्यात कोसळली.

या घटनेनंतर भानावर आलेल्या पडवळांनी तेथून धूम ठोकली, तर वाघ बंधूंनी जखमी झालेल्या दोन्ही महिलांना सुरुवातीला साकूरफाटा, त्यानंतर संगमनेरातील खासगी रुग्णालय आणि शेवटी प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. या घटनेत रुपाली ज्ञानदेव वाघ (वय २८) या विवाहितेचा मृत्यू झाला असून मोनिकावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणी मध्यरात्री फिर्याद दाखल झाल्यानंतर घारगाव पोलिसांनी कर्जुलेपठार येथील मुरलीधर रामकृष्ण पडवळ, त्याचा मुलगा विक्रम व सून अलका या तिघांवर खुनासह खुनाचा प्रयत्न आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रोसिटी) गुन्हा दाखल करुन आज सकाळी तिघांनाही अटक केली आहे. त्यांना आज दुपारनंतर न्यायालयासमोर हजर केले जाणार असून पोलीस कोठडीची मागणी होणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास घारगावचे निरीक्षक विलास पुजारी करीत आहेत.

या प्रकरणाचा मागोवा घेताना खून झालेल्या विवाहितेच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. मोलमजूरी करुन उदरनिर्वाह करणाऱ्या वाघ कुटुंबातील सात सदस्यांमध्ये चार महिला आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तरी उलटली असतानाही संगमनेरसारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या तालुक्यात शौचास जाण्यावरुन एखाद्या महिलेचा बळी जावा खरेतर ही अतिशय लाजिरवाणी घटना आहे. प्रशासनाने त्याकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची आणि भविष्यात पुन्हा असा प्रकार घडणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे.

**पेरण्यांची घाई नको; पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस!**

नंतरच पावसाचे मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. त्यांनी सांगितले की, मोसमी पावसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात बारा जून रोजी मराठवाड्यातील काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे बारा आणि पंधरा जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तेरा ते पंधरा जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात मासेमारी करण्यासाठी जाऊ नये. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा चमकताना झाडांच्या खाली आसरा घेऊ नये, वीजेची आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वीज पुरवठा खंडित करुन ठेवावीत, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या स्त्रोतातून तत्काळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

**अकोले व संगमनेर तालुक्यातील सिंचन प्रकल्पाच्या कामांना गती द्या : ना. विखे-पाटील**

विकास कामे आणि संगमनेर तालुक्यातील साकुर व पठार भागातील जलनियोजन संदर्भात मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता तथा सह सचिव संजीव टाटू आदी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, आमदार डॉ. किरण लहामटे आणि आमदार अमोल खताळ यांनी सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याबाबत ज्या योजना, प्रकल्पाची कामे सुचवली आहेत त्या योजना व कामांचा जलसंपदा विभागाने अभ्यास करावा. ज्या योजनाच्या कामांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे त्याचे सर्वेक्षण करून आराखडा तयार करावा. अकोले व संगमनेर मधील सिंचन प्रकल्पांची साठवण क्षमता, प्रत्यक्ष होत असलेला पाणी साठा याबाबतही अधिकाऱ्यांनी अहवाल सादर करावा.

बैठकीत मेळावणे बंधारा, बिताका पाणी वळण बंधारा, भंडारदरा, शिळवंडी, बलठण, पाडोशी बुडित बंधारे बांधणे, निमगाव भोजापूर धरण पाण्याचे योग्य नियोजन, साकुर पठार भागातील पाणी प्रश्न आणि निळवंडे डावा व उजवा कालवा यासह अन्य विषयांचाही आढावा घेण्यात आला.

**अल्पवयीन मुलीला पळवून अत्याचार करणाऱ्याला बेड्या**

शोध घेऊन त्यास अटक करण्यासाठी पथक नेमले. तपासी पथकाने गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या सहा तासांत त्यास शहर टाकळी येथून ताब्यात घेतले. त्याला शेवगाव पोलिस स्टेशनला आणून अटक केली. तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुंदरडे यांनी पीडित मुलीस विश्वासात घेऊन तिचा जबाब घेतला असता, आरोपीने मागील दोन महिन्यांपासून हॉटेल जगदंबा येथे तिच्यासोबत लैंगिक संबंध ठेवल्याचे सांगितले. तसेच, एक वर्षापूर्वी पीडितेच्या आई-वडिलांनी तिचे लग्न धुळे येथील एका मुलासोबत लावल्याचेही मुलीने जबाबात सांगितले.या जबाबावरुन या गुन्ह्यात वाढीव कलम समाविष्ठ करून पीडितेचे आई-वडील, सासु-सासरे, तसेच पतीलाही आरोपी बनवण्यात आले आहे. पीडितेची वैद्यकिय तपासणी करण्यात आली.

**मेंढपाळाच्या पालावर सशस्त्र दरोडा!**

तळावर आले. त्यांनी फिर्यादीला काठीने मारले असता त्यांनी त्यांच्या कडील कांबळ एका दरोडेखोराच्या अंगावर फेकून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी दोघांनी त्यांना पकडले व एकाने त्यांच्या गळ्याला चाकू लावून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीची पत्नी जागी झाली व मदतीसाठी आरडा ओरडा करू लागली असता त्यांनाही दरोडेखोरांनी काठीने मारहाण करत चाकू दाखवून धमकी दिली. त्यानंतर तुमच्या जवळील पैसे व दागिने काढून द्या नाहीतर एकालाही जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देत फिर्यादीची पत्नी शीतल होडगर, मेव्हणा लक्ष्मण सूळ, प्रकाश सूळ, सुमन सूळ यांना काठीने बेदम मारहाण करत चाकूने वार केले. तसेच त्यांच्या कडील ७० हजारांची रोकड, सुमारे पावणे तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने असा १ लाख ५१ हजारांचा ऐवज घेवून तेथून पोबारा केला, असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी करीत आहेत.

# पूलासाठी पर्यटन मंत्र्यांना आ.लंघे यांचे साकडे

**नायक वृत्तसेवा, नेवासा**

देवगड येथील श्री दत्त मंदिर संस्थान नजीक असलेल्या प्रवरा नदीवरील रखडलेल्या पादचारी पुलाचे अपूर्ण काम पूर्ण करण्यात यावे, यासाठी आमदार विठ्ठल लंघे यांनी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे लक्ष वेधत साकडे घातले.



अहिल्यानगर येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याला पर्यटनमंत्री शंभूराज देसाई नुकतेच आले होते. यावेळी नेवाशाचे आमदार विठ्ठल लंघे यांनी तालुक्यातील प्रलंबित विविध विकासकामांबद्दल त्यांना माहिती दिली. त्यात गेल्या दहा वर्षांपासून अपूर्ण असलेला श्री दत्त मंदिर संस्थान, देवगड येथील प्रवरा नदीवरील पादचारी पूलाच्या अपूर्ण कामासंदर्भात पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधले. परिसरातील दहा ते बारा गावांचा संपर्क व दळणवळणासाठी हा पूल गरजेचा आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी कमतरतेचा लेखी अहवाल प्रस्ताव सादर करून गेल्या दहा वर्षांपासून निधी कमतरतेमुळे काम अपूर्ण अवस्थेत असून परिसरातील दहा-बारा गावांच्या नागरिकांना, विद्यार्थ्यांना व देवगड भक्त परिवाराला मोठ्या त्रासाला तोंड द्यावे लागत आहे. यासाठी या पूलाचे काम किती महत्त्वाचे आहे, हे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या निदर्शनास आणून दिले. दत्त मंदिर देवस्थानात दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे. तसेच परिसरातील नागरिक व शालेय विद्यार्थी व असंख्य पायी येणाऱ्या दिंड्या या प्रवरा नदीतून होडीद्वारे धोकादायक प्रवास करीत असतात. त्यांची गैरसोय रोखण्यासाठी आपण या पूलासाठी ताबडतोब निधी उपलब्ध करून द्यावा व काम तात्काळ चालू करून भाविकांची गैरसोय टाळावी, अशा निवेदनाचा प्रस्ताव आ. लंघे यांनी मंत्री देसाई यांच्याकडे सुपूर्त केला.

- या प्रवरा नदीवरील पुलाला नेवासा बुद्रक सबस्टेशनजवळील जुना गोधेगाव रस्ता धामोरी मार्गे जोडला, तर परिसरातील कालभैरवनाथ देवस्थान, नाथबाबा मंदिर ही देवस्थाने जोडली जाणार असून त्याचा फायदा बहिरवाडी धामोरी उस्थळ खालसा, सुरेगाव, भालगाव, बेलपिंपळगाव जैनपूर बेल पांढरी, साईनाथ नगर टाकळीभान व श्रीरामपूर रोड मार्गे येणारा देवगड परिवार व या परिसरातून येणाऱ्या भाविकांना होणार आहे.

## बनावट अ‍ॅप घोटाळ्याच्या चौकशीसाठी शिंगणापुरात धरणे

**नायक वृत्तसेवा, नेवासा**

शनिशिंगणापूर मधील बनावट अ‍ॅप घोटाळ्याची तातडीने चौकशी करून कारवाई व्हावी, यासाठी काँग्रेस व विविध संघटनांकडून शिंगणापूर देवस्थान आवारात धरणे आंदोलन करण्यात आले.

शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी, पुजाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत अ‍ॅपच्या ऐवजी बनावट अ‍ॅप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून तसेच बनावट देणगी पावती व बनावट क्यू आर कोडच्या माध्यमातून करोडो रुपयांचा घोटाळा करून हा निधी आपल्या खाजगी खात्यावर वळवून घेतला. यात देवस्थानची व देशभरातील शनिभक्तांची मोठी लूट या घोटाळा बहाद्दरांनी केली. याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी केली. तर देवस्थान प्रशासनाकडे त्यांनी परवानगी दिलेल्या अ‍ॅपबद्दल माहिती मागण्यात आली होती. यामध्ये धर्मदाय आयुक्त यांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव, करारनामा अशी माहिती मागण्यात आली होती. देवस्थान प्रशासनाने हि माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घातल्याने इतर अ‍ॅपची माहिती दाबण्याचा प्रयत्न केल्याने सोमवारी देवस्थान आवारात काँग्रेस व विविध संघटनाकडून भर उन्हामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले.

## तळेगाव दिघेत नेत्ररोग निदान शिबीर उत्साहात



**नायक वृत्तसेवा, तळेगाव दिघे**

राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमांतर्गत समता फाऊंडेशन आणि ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत नेत्ररोग निदान शिबीर उत्साहात पार पडले. सदर शिबिरात १२० रुग्णांची मोफत नेत्ररोग तपासणी करण्यात आली.

तळेगाव दिघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंगळवारी नेत्ररोग तपासणी शिबीर पार पडले. प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब दिघे व प्रभारी सरपंच मयुर दिघे यांच्या हस्ते नेत्ररोग तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, डॉ. बी. एस. डामसे, डॉ. निलेश माने, नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. एम. के. संगारे, राजेश दिघे, अतुल कदम, गोरख इल्हे, विकास दिघे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

सदर शिबीरात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू मोफत शस्त्रक्रिया शिबिरात १२० रुग्णांनी सहभाग नोंदवला. सदर शिबिरात नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. एम. के. संगारे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. एस. डामसे, डॉ. निलेश माने यांनी नेत्र रुग्णांची मोफत तपासणी केली. तळेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित मोफत नेत्ररोग निदान शिबीर उत्साहात पार पडले.

**नायक ANCHOR**

## चणेगाव आणि परिसरात वटवृक्षांचे रोपण!

### गीतांजली आसावा सह महिलांचा पुढाकार

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

मंगळवारी वटपौर्णिमेच्या दिवशी चणेगाव आणि परिसरात वटवृक्षांचे रोपण करण्यात आले. यासाठी गीतांजली आसावा आणि परिसरातील महिलांनी पुढाकार घेत वृक्षाचे रोपण करून त्याच्या पुढील संवर्धनाची जबाबदारी स्विकारली.



संगमनेर तालुक्यात दंडकारण्य अभियानांतर्गत वटपौर्णिमेचे औचित्य साधत प्रत्येक वाडी, वस्ती व गावात वटवृक्षाची पुजा व रोपण करण्यात आले.भारतीय संस्कृतीमध्ये सत्व, श्रद्धा, आणि पतीपरायणतेचे प्रतीक असलेल्या वटसावित्री पौर्णिमेनिमित्त विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करतात. देशभरात मोठ्या उत्साहात सर्वत्र वटसावित्री पौर्णिमा सण साजरा झाला. याच वेळी वृक्ष संवर्धनाची जबाबदारी तालुक्यातील महिलांनी घेऊन आदर्श निर्माण केला आहे. थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी सुरू झालेले दंडकारण्य अभियान, पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ बनली असल्याचे प्रतिपादन गितांजली आसावा यांनी यावेळी केले. चणेगाव, झरेकाठी, दाढ खुर्द, खळी, पिंप्री, लौकी अजमपुर, शिबलापुर, आश्वी खुर्द, शेडगाव, हंगेवाडी या गावात आयोजित वटपौर्णिमा निमित्ताने वटवृक्ष पुजा, व रोपण प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या शितल ऊगलमुगले, नंदा वाणी सह स्थानिक महिला सहभागी झाल्या होत्या.

## इस्त्रोच्या सहलीसाठी आदिती देवकरची निवड

**नायक वृत्तसेवा, श्रीरामपूर**

गुरुदेव दत्त एज्युकेशन सोसायटी, सावरगाव संचलित कै. अनिल दिगंबर मुळे विद्यालयाची पाचवीची विद्यार्थिनी आदिती राहुल देवकर हिने अवकाश संशोधन क्षेत्रातील डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत तालुक्यात पाचवा क्रमांक मिळवला. यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) च्या सहलीसाठी आदितीची निवड झाली.

या कार्यक्रमांतर्गत आदितीबरोबरच निवडक विद्यार्थ्यांना इस्रोच्या शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची, कार्यशाळेत सहभागी होण्याची आणि अवकाश संशोधनाच्या मूलभूत संकल्पना समजावून घेण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर आदितीने मंथन राज्यस्तरीय



प्रज्ञाशोध परीक्षेत ३०० पैकी २३२ गुण मिळवून तालुक्यात दुसरा क्रमांक, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १९८ गुण मिळवून उत्तीर्ण झाली. आदितीने या निवड प्रक्रियेत आपली बुद्धिमत्ता आणि उत्साहाने सर्वांना प्रभावित केले आहे. आदिती देवकरच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय कुलकर्णी, सचिव सुनीता संजय कुलकर्णी, उपाध्यक्ष संतोष कावले, संचालक मधुकर मेहेत्रे, मुख्याध्यापिका देठे यांसह सर्व शिक्षक वृंद, संस्था पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, पालकांनी अभिनंदन केले आहे.


A ORNATE FFINE DECOR

पाहिजेत

| अ.क्र. | पदाचे नाव | जागा |
|---|---|---|
| 1. | फर्निचर कामाकरिता सुपरवायझर | 2 |
| 2. | कॉम्प्युटर ऑपरेटर | 2 |
| 3. | हेल्पर | 2 |

पत्ता : निंबाळे रोड, समनापुर, गणपती मंदिराजवळ, समनापुर , संगमनेर . मोबाईल - 97 67 04 18 99

कोथमिरे त्रिशुल छाप मसाले ॲग्रो प्रोडक्टस् कंपनीकरीता

चवीला खरे कोथमिरे! कोथमिरे SINCE 1992

ड्रायव्हर पाहिजेत

1) कार ड्रायवर- 1 जागा

2) कमरशियल ड्रायव्हर-1 जागा

(सर्व गाड्यांचे ज्ञान, लायसन आवश्यक) अनुभव कमीत कमी ५ वर्षे

निरव्यसनी, प्रामाणिक व होतकरु इच्छुकांनी संपर्क साधावा.

आकर्षक पगार व सुविधा उपलब्ध

पत्ता- १८५६, वेल्हाळे रोड, गुंजाळवाडी, संगमनेर

मोबाईल क्र. ९९७०२९५३८६, ९५६१११९५८५






MALPANI

प्रोसेस विभागात

कामगार भरती

चालू आहे!

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,

पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,

नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)

पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व

ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती

सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-

अधिक माहितीसाठी संपर्क

मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी

मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

मो. ८९५६९५६६१२

मो. ९८२२६०१६५२

मो. ९५५२८८१३००


‘बांधिलकी जनहिताची नायक’ हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अ‍ॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

## पाहिजेत

### धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर





शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155


# बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी स्वबळावर उभे राहावे : शालिनी विखे

नायक वृत्तसेवा, धांदरफळ



प्रत्येक महिलेच्या अंगी काही ना काही विशेष गुण असतात. त्या गुणांचा उपयोग करून महिलांनी स्वतःला सक्षम करावे, तसेच आलेल्या प्रत्येक संधीच सोनं करावं. महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभारून स्वबळावर उभे राहावे असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील यांनी केले.

तालुक्यातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या पेमगिरी येथील महाकाय वटवृक्षाच्या सानिध्यात वटपोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली, या निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जाकमत बाबा तरुण मित्र मंडळ आणि संगमनेर तालुका महायुती महिला आघाडीच्या वतीने खास महिलांसाठी 'उत्सव माझ्या कुंकवाचा, वटसावित्री पौर्णिमेचा' या महिलांसाठीच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर आमदार अमोल खताळ यांच्या मातोश्री मंगल खताळ, पत्नी नीलम खताळ, पंचायत समितीच्या माजी सदस्या सुनिता कानवडे, वर्षा डुबे यांच्यासह अनेक महिला मान्यवर उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जाकमत बाबा तरुण मित्र मंडळाच्या सर्व तरुणांनी विशेष परिश्रम घेतले. शालिनी विखे पुढे म्हणाल्या की, आपल्या कुटुंब व्यवस्थेमध्ये पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धत रूढ होती. त्यामुळे आई-वडिलांकडून मुलांना योग्य संस्कार मिळत होते, मात्र आता विभक्त कुटुंबपद्धती झाली आहे, त्यामुळे संस्कार मिळणे कठीण झाले आहे. महिलांनी एकमेकींचे पाय खेचण्यापेक्षा एकमेकींना सहकार्य करावं, विधवा महिलेला समाजबाह्य न करता तिला मान-सन्मान द्यावा, असंही त्यांनी सांगितलं. पती गेला तरी महिला कुंकू लावू शकते, कारण तीही समाजाचा भाग आहे. मुलगाच वंशाचा दिवा नाही, मुलगी सुद्धा पणती आहे अन् ती कायम प्रकाश देत असल्याचे विखे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वप्रथम जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील, आमदार अमोल खताळ यांच्या मातोश्री मंगल खताळ, पत्नी नीलम खताळ यांच्यासह उपस्थित महिलांनी महाकाय वटवृक्षाची पूजा करून सर्व महिलांच्या बरोबरीने सात फेरे मारले आणि या वटसावित्री पौर्णिमेनिमित्त प्रत्येक महिलेला वडाचं रोप भेट दिले. महिलांच्या दृष्टीने वट पौर्णिमा हा सण महत्वाचा आहे. जसे हा वड वाढत गेला तसेच या तालुक्यातील सर्व लाडक्या बहिणींनी एकत्रित येऊन परिवर्तन केले. त्यामुळे तुमच्या पाठीमागे मी व तुमचे भाऊ भक्कम उभे राहतील असा विश्वास आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी व्यक्त केला.

■ भारत मातेचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या पत्नी वैष्णवी उपरे, निलम कासार, वर्षा प्रतीक्षा दीक्षित, सविता दत्ता कासार, मनाली नवले यांचा तसेच बिबट्याच्या तावडीतून आपल्या मुलाला वाचवणाऱ्या कविता खताळ यांचा वट वृक्ष देऊन यावेळी सन्मान करण्यात आला. महिला पोलीस अनिता गुंजाळ, मीरा बिबवे, सविता सोळशे, शशीकला हांडे, शिला साबळे, सुवर्णा नवले, लता जाधव, सुषमा भांगरे, सविता रुपवते, प्रतिभा थोरात, लता जाधव, निशा धाडी, सुवर्णा नवले, माधुरी मुंडलिक या महिला कर्मचाऱ्यांचा मान्यवर महिलांच्या हस्ते वडाचे रोप देऊन सन्मान करण्यात आला.

# वटसावित्री पौर्णिमेच्या मुहूर्तावर २५२५ वटवृक्षांचे रोपण!

नायक वृत्तसेवा, संगमनेर



थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेनिमित्त तालुक्यातील १७१ गावे २५८ वाड्या व विविध वस्त्यांवर महिला भगिनींनी मोठ्या आनंदात व उत्साहात २५२५ वटवृक्षांचे रोपण व पूजन करून वृक्ष संवर्धनाचा राज्याला मंत्र दिला.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आ.डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडकारण्य अभियान समिती व अमृत उद्योग समूह यांच्या सहकार्याने आणि नागरिकांच्या सहभागातून दंडकारण्य अभियान, पर्यावरण संवर्धनाची लोकचळवळ बनली आहे.प्रकल्पप्रमुख दुर्गा तांबे व कॅन्सरतज्ज्ञ डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली यावर्षी तालुक्यातील १७१ गावे २५८ वाड्या व विविध वस्त्यांवर २५२५ वटवृक्षांचे रोपण व पूजन महिलांनी केले. या वटवृक्षाच्या संवर्धनाची जबाबदारी स्थानिक महिलांनी उचलली आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये सत्व, श्रद्धा, आणि पतीपरायणतेचे प्रतीक असलेल्या वटसावित्री पौर्णिमेनिमित्त विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाची पूजा करतात.देशभरात मोठ्या उत्साहात सर्वत्र वटसावित्री पौर्णिमा सण साजरा झाला. याच वेळी वृक्ष संवर्धनाची जबाबदारी तालुक्यातील महिलांनी घेऊन राज्यापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे.

देवकौठे ते बोटा अशा १०६ कि.मी.लांबी असलेल्या विस्तीर्ण संगमनेर तालुक्यामध्ये सर्व महिलांनी देव वृक्ष असलेल्या वटवृक्षाचे पूजन व संवर्धन करून पर्यावरण संवर्धनात महत्त्वाचा वाटा उचलताना राज्याला हिरव्या सृष्टीचा मंत्र दिला आहे. गावोगावी पारंपारिक पद्धतीने नटून-थटून महिलांनी वटवृक्षाचे पूजन केले. यावेळी विविध गावांमध्ये निर्मला गुंजाळ, अर्चना बालोडे, प्रमिला अभंग, मंदा सोनवणे, दिप्ती सांगळे, प्रीती फटांगरे, भाग्यश्री नरवडे, बेबी थोरात, मीनाक्षी थोरात, ममता गुंजाळ, पद्मा थोरात, शकुंतला सोसे, शितल उगलमुगले, मीरा शेटे, नंदा खेमनर, प्रतिभा जोंधळे, निशा कोकणे, लता गायकर, अनिता सोनवणे, यांच्यासह स्थानिक महिलांनी मोठ्या उत्साहाने वटवृक्षाचे पूजन केले. भारतीय संस्कृतीमध्ये वटसावित्री पौर्णिमेला मोठे महत्त्व असून वड हा दीर्घायुष्य वृक्ष आहे, तो मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन देत असून आध्यात्मिक आणि शास्त्रीय असे दोन्ही कारण वट पूजेसाठी आहेत.

■ तीन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनामुळे ऑक्सिजनचे महत्त्व प्रत्येकाला कळाले. आपल्याला आयुष्यभर मोफत ऑक्सिजन देणारे हे वृक्ष आहेत. त्यामध्ये वटवृक्ष, पिंपळ, उंबर, कडुलिंब हे सर्वाधिक ऑक्सिजन देणारे असल्याने त्यांना आपण देव वृक्ष म्हणून संबोधतो. प्रत्येक महिलेने मुलांप्रमाणे वृक्षांची काळजी घेतली तर पर्यावरणाचा मोठा धोका आपण टाळू शकतो. ग्लोबल वार्मिंगच्या समस्येमुळे सजीव सृष्टीला मोठा धोका निर्माण झाला असून हा धोका टाळण्यासाठी वृक्ष रोपण संवर्धन व पर्यावरण जपण्यासाठी महिलांनी व युवक आणि युवतींनी या पुढील काळात काम करावे असे आवाहन डॉ. जयश्री थोरात यांनी यावेळी केले. पेमगिरी येथील साडेतीन एकरवर असलेला महाकाय वटवृक्ष संगमनेर तालुक्याची ओळख असून या वटवृक्षाला ऐतिहासिक दर्जा मिळावा यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


SMBT CLINIC
एसएमबीटी क्लिनिक, संगमनेर आयोजित
पोटविकार (गॅस्ट्रो) तपासणी व उपचार शिबिर
शुक्रवार, दि. 13 जून 2025
वेळ : स. 10.00 ते दु. 2.00 वाजेपर्यंत
शिबिरातील वैशिष्ट्ये :
• मोफत नाव नोंदणी
• तज्ञ गॅस्ट्रोइन्ट्रोलॉजिस्ट यांचा मोफत सल्ला
• अल्पदरात एंडोस्कोपी, कोलोनोस्कोपी, ईआरसीपी व इतर चाचण्या
पोटाच्या सर्व समस्यांवर खात्रीशीर उपचार
• पोटामध्ये वेदना होणे
• गिळायला त्रास होणे, गिळता न येणे
• अचानक वजन कमी होणे, भूक कमी लागणे
• छातीमध्ये व पोटामध्ये जळजळ होणे
• वारंवार अतिसार (डायरिया) होणे
• बद्धकोष्ठता
• कावीळ
• काळी संडास
• संडासातून रक्त येणे
• पित्ताशयातील खडे व पित्तनलीकेतील खडे
• यकृताचे विकार
• स्वादूपिंडाचे विकार
• पोटातील आतड्याला सूज येणे
• उलट्या व रक्ताच्या उलट्या होणे
सर्व रेशनकार्ड धारकांसाठी मोफत उपचार व शस्त्रक्रिया
(महात्मा फुले जनआरोग्य व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत)
ठिकाण : एसएमबीटी क्लिनिक, घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
नाव नोंदणीसाठी संपर्क : 9226089157
नामांकित कंपन्यांची औषधे सवलतीच्या दरात उपलब्ध
आता आपली एसटी महामंडळ रुग्णांच्या सोयीसाठी...
संगमनेर : स. ७:०० वा. (संगमनेर बसस्थानक - सिन्नर - एसएमबीटी हॉस्पिटल - घोटी)
एसएमबीटी हॉस्पिटल : सायं. ४.१५ वा. (एसएमबीटी हॉस्पिटल - सिन्नर - संगमनेर)
एसएमबीटी हॉस्पिटल, नंदी हिल्स्, ता. इगतपुरी, जि. नाशिक, 0253 694 0000
एसएमबीटी क्लिनिक, अमृतनगर, घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, 0253 694 0000



गुंतवणुकीची प्रत्येक स्टेप तुमच्या आर्थिक स्वप्नपूर्तीकडे
MUTUAL FUNDS Sahi Hai
SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर


# चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस एक वर्षाने अटक

नायक वृत्तसेवा, देवळाली प्रवरा

तरुणास मारहाण करून लूटल्याच्या गुन्ह्यातील वर्षभरापासून फरार असलेल्या आरोपीच्या राहुरी पोलिसांनी मुसक्या आवळल्या. न्यायालयाने त्यास पोलिस कोठडी सुनावली.

ताहाराबाद येथील इंडियन आईलच्या पेट्रोलपंपावरून पेट्रोल भरून फिर्यादी गावाकडे जात होता. त्यावेळी आरोपी अविनाश भिकन विधाते (वय २९, रा. ताहाराबाद) याने त्यास मोबाईल खाली पडल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादी व साक्षीदार थांबले असता, आरोपी विधाते त्यांच्याकडे गेला व शिवीगाळ करून लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादीच्या खिशातून १७ हजार रुपये असलेले पैशाचे पाकीट घेऊन तेथुन दुचाकीवर पळून गेला. याबाबतच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. २९ जून २०२४ पासून या घटनेतील आरोपी अविनाश भिकन विधाते फरार होता. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिस हेड कॉन्स्टेबल जानकीराम खेमनर, रामनाथ सानप, पोलिस अंमलदार अविनाश दुधाडे यांनी त्याचा शोध घेऊन त्याला अटक केली. राहुरी न्यायालयाने आरोपीस पोलिस कोठडी सुनावली.


दर्शन टेक्सटाईल मार्केट
आजची स्त्री, आजचा स्टाइल
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५